# किमान कौशल्य विकास अभ्यासक्रमाचे
# प्रमाणपत्र वितरण समारंभ
# दि.०४ ऑक्टोबर २०१८

प्रस्तावना :-शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये संगणक विभाग,वाणिज्य शाखा व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने Tally व DTP हा किमान कौशल्य विकास अभ्यासक्रम राबविण्यात आला.

अध्यक्ष :-प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील

प्रमुख अतिथी
व मार्गदर्शक :- १) मा.श्री.विजय जाधव
(संचालक , चार्टड अकॉउंटन्ट फर्म,अमरावती)
२) मा.श्री.विलास मराठे
(प्रबंध संपादक,दै.हिंदुस्थान,अमरावती)

DTP प्रशिक्षक :-मा.श्री.अरविंद वानखडे

Tally प्रशिक्षक :-मा.श्री.भारतीय गुप्ते

प्रास्ताविक :-प्रा.डॉ.शालिनी पांडे

पाहुण्यांचे परिचय:-प्रा.डॉ.मंजुषा धापुडकर

आयोजक :-संगणक विभाग,वाणिज्य विभाग,इतिहास विभाग

सहभाग :-कला व वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी

उद्देश :-विद्यार्थ्यांमध्ये किमान कौशल्य विकसित करणे.

# अहवाल

संगणक विभाग, वाणिज्य विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०४ ऑक्टोबर २०१८ Tally व DTP रोजी हा किमान कौशल्य विकास अभ्यासक्रम राबवण्यात आला. सदर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र वितरण चार्टड अकॉउंटन्ट फर्म चे संचालक मा.श्री विजय जाधव, दै.हिंदुस्तानचे प्रबंध संपादक मा.श्री विलास मराठे DTP प्रशिक्षक मा.श्री.अरविंद वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.सदर कार्यक्रमामध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना मा.श्री.विजय जाधव यांनी नूतन विदर्भ शिक्षण मंडळाद्वारा चालविले जाणारे महिला महाविद्यालय हे समाजहित जोपासणारे एक महाविद्यालय आहे.पदवी अभ्यासक्रमासोबत व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयाचे त्यांनी कौतुक केले.आजच्या इंटरनेटच्या युगात संगणकीय लेखांकन ही संकल्पना महत्वाची असून Tally व DTP सारखे अभ्यासक्रम हाती घेऊन विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, आत्मसन्मानाची भावना वृद्धिंगत करण्यात महाविद्यालयाचा महत्वाचा वाटा असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.महाविद्यालयातील महिलांना सक्षमीकरण करण्याचे पाहिलेले स्वप्न अश्या प्रकारचे उपक्रम राबविल्याने पुर्णत्वात जाईल अशी आशा व्यक्त केली . The roots of education are bitter but the fruit is sweet. कोणताही उपक्रम राबविणे व त्यात विद्यार्थिनी सहभागी होणे हे कार्य कठीण आहे.परंतु शेवटी त्या उपक्रमाची फलनिष्पत्ती ही सकारात्मक असते असे मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.मोहरील सर यांनी महिला सक्षमीकरणासाठी संगणक विभागाद्वारा राबविल्या गेलेल्या उपक्रमाचे कौतुक केले आणि अशा प्रकारचे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सातत्याने महाविद्यालयातर्फे राबविल्या जाईल याची ग्वाही दिली.Tally व DTP हे अभ्यासक्रम विद्यार्थिनींना रोजगार मिळवून देण्यास निश्चितच सहाय्यक ठरेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी डॉ.सुषमा देशमुख,प्रा.डॉ. अरुणा वाडेकर तसेच तासिकाभार तत्वावरील प्राध्यापक व वाणिज्य शाखेतील बहुसंख्य विद्यार्थिनीच्या उपस्थितीत संपन्न झाला.

फलनिष्पत्ती : १) विद्यार्थिनींमध्ये DTP व Tally या विषयाचे किमान कौशल्य विकसित झाले.

२) Tally व DTP चे प्रमाणपत्र DTP प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनींने केले.

३) संचालन कु.सना अंजुम (B.COM II) हिने केले.

४) आभार कु.पूजा केडिया हिने मानले.



प्रमाणपत्र वितरण समारंभात विद्यार्थिनींना संबोधीत करतांना मा.श्री विजय जाधव



प्रमाणपत्र वितरण समारंभात विद्यार्थिनींना संबोधीत करतांना मा.प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील



प्रमाणपत्र वितरीत करतांना मान्यवर



प्रमाणपत्र वितरीत करतांना मान्यवर